## निशाणी क्र. २२ वरील आदेश

**१.** प्रतिवादी नं.१ तर्फे विधीज्ञ श्री.टी.आर.माडगुळकर यांनी प्रतिवादीस हजर होणेकरीता पुढील मुदत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार प्रतिवादी नं.१ हा परराज्यात असुन आजारी असल्याने आज पोहचु शकत नाही. तरी मुदत मिळण्याची विनंती केली.

२. वादीच्या विधीज्ञांनी सदर अर्जास हरकत घेऊन त्यांचे म्हणणे नि.२२ खाली दिले. वादी यांचे म्हणण्यानुसार प्रतिवादी नं.१ हा मुद्दामहुन व जाणुनबुजून मे. कोर्टात हजर राहण्यास टाळाटाळ करत आहे. प्रतिवादी नं.१ यास २८/०१/२०२३ रोजी वकीलपत्र दाखल करण्यात मुदत देऊनही प्रतिवादी नं.१ हा गैरहजर राहीलेला आहे. प्रतिवादी नं.१ हा न्यायालयाचा मौल्यवान वेळ वाया घालवत आहे व अशा प्रकारचे अर्ज देऊन वादीस न्यायापासुन वंचित ठेवत आहे.

**३.** प्रतिवादी नं.१ यास समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी नं.१ यास बरीच संधी देऊनही गैरहजर आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.१ विरुध्द एकतर्फा आदेश करावा अशी विनंती केली.

**४.** वादी व प्रतिवादी नं.१ तर्फे विधीज्ञ टी.आर.माडगुळकर यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजुतर्फे त्यांच्या अर्जानुसार व म्हणण्यानुसार युक्तीवाद करण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी नं.१ यास नि.६ नुसार दाव्याचे समन्स व नि.७ नुसार कारणे दाखवा नोटीशीची बजावणी दि.०३/०३/२०२३ रोजी झालेली आहे. सदर बजावणीबाबत प्रतिवादी नं.२ तर्फे हरकत घेऊन प्रतिवादी नं.१ यास समन्स बजावणीकामी योग्य ते आदेश व्हावेत या प्रकारचा अर्ज प्रतिवादी नं.२ तर्फे नि.१६ वरती दाखल करण्यात आला होता. सदर अर्जावर दि.१७/०९/२०२३ रोजी आदेश पारित करुन प्रतिवादी नं.२ चा अर्ज नामंजुर करण्यात आला होता. त्यानंतर पुढील तारखेस विधीज्ञ श्री. टी.आर.माडगुळकर यांनी नि.१६ वरील आदेशाविरुध्द

माननीय उच्च न्यायालयात दाद मागण्याची आहे व तोपर्यंत सदर आदेश स्थगित करावा अशी विनंती केली.

**५.** सदर अर्जावर आदेश पारित करुन नि.१६ वरील आदेशास स्थगिती न देता स्थगिती आदेश आणण्याकरीता पंधरा दिवसांची मुदत देण्यात आली होती. परंतु प्रतिवादी नं.१ तर्फे सदर अर्जाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्यात आलेली नाही. त्यानंतर दि.२८/०८/२०२३ रोजी अर्जदारास वकीलपत्र व कैफियत देण्याकरीता अर्ज दाखल करण्यात आला होता व त्यानुसार प्रतिवादी नं.१ यास संधी देण्यात आली होती. परंतु प्रतिवादी नं.१ हा आजरोजी सदर प्रकरणात हजर झालेला नाही. परंतु मुदतीचा अर्ज आजारी असलेच्या कारणावरुन दाखल केलेला आहे.

**६.** अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी नं.१ याच्यावरती दि.०३/०३/२०२३ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे व त्यास वारंवार संधी देऊनही तो न्यायालयासमक्ष हजर झालेला नाही. नि.१६ वरील अर्ज नामंजुर केल्यानंतरही प्रतिवादी नं.१ यास हजर होण्याकरीता संधी देण्यात आली होती परंतु प्रतिवादी नं.१ हा सदर प्रकरणात हजर झालेला नाही. यावरुन प्रतिवादी नं.१ हा वेळकाढुपणा करत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज नामंजुर करणे योग्य होईल. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत काही आदेश नाहीत.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.09.11 16:53:37 +0530

आटपाडी.

**( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक ११/०९/२०२३.

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.,
आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | - A. A. Jamadar |
| Court | - Jt. CJJD and JMFC, Atpadi. |
| Date | - 11.09.2023 |
| Order signed by the Presiding Officer on | - 11.09.2023 |
| Order uploaded on | - 11.09.2023 |